कळवा प्रभाग समिती कार्यालय,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.
दिनांक :- २५.६.२०१०.

**मा. कळवा प्रभाग समितीची सभा**

**सभा सुचना क्रमांक - २, दिनांक - २५.०६.२०१०**

**सभा क्रमांक - १, दिनांक - ३०.०६.२०१०**

प्रति,
श्री/श्रीमती....................................,
सन्मा.सदस्य/सदस्या,
कळवा प्रभाग समिती,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

या सुचनेद्वारे आपणांस कळविण्यात येते की, ठाणे महानगरपालिकेच्या कळवा प्रभाग समितीची सभा, **बुधवार,दिनांक** -**३०.०६.२०१०** रोजी, **सकाळी ११.३०** वाजता यशवंत रामा साळवी, ऑलिम्पिक साईज तरण तलाव, कळवा प्रभाग समिती सभागृहात **सभा सुचना क्रमांक -२,दिनांक - २५.०६.२०१०** रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचारविनिमय करणेसाठी आयोजित करण्यात येत आहे.

कृपया सदर सभेस आपण उपस्थित रहावे, ही विनंती.

**मा. अध्यक्ष महोदय, कळवा प्रभाग समिती यांचे आदेशान्वये.**

**प्रभाग अधिकारी,**
**कळवा प्रभाग समिती,**
**ठाणे महानगरपालिका, ठाणे.**

**सभा सुचना क्रमांक - २, दिनांक - २५.०६.२०१० रोजीची विषयपत्रिका.**

| प्र. क्र | विषय |
|---|---|
| २) | मा.कळवा प्रभाग समितीचे दिनांक - ३१.०५.२०१० रोजीच्या सभेचे इतिवृत्तांत मंजूर करणे. |
| ३) | कळवा नाक्यावरील छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा हलविणेबाबत.(सन्मा.सदस्य श्री.उमेश पाटील यांचे पत्र) |

**प्रभाग अधिकारी,**
**कळवा प्रभाग समिती,**
**ठाणे महानगरपालिका, ठाणे.**

कळवा प्रभाग समिती कार्यालय,
ठाणे महानगरपालिका,ठाणे.
दिनांक - २५.०६.२०१०

कळवा प्रभाग समिती कार्यालय,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.
दिनांक :- २५.६.२०१०.

**मा. कळवा प्रभाग समितीची सभा**

**सभा सुचना क्रमांक -२, दिनांक -२५.०६.२०१०**

**सभा क्रमांक -१, दिनांक -३०.०६.२०१०**

प्रति,
श्री/श्रीमती..................................,
सन्मा.सदस्य/सदस्या,
कळवा प्रभाग समिती,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

या सुचनेद्वारे आपणांस कळविण्यात येते की, ठाणे महानगरपालिकेच्या कळवा प्रभाग समितीची सभा, **बुधवार,दिनांक** -**३०.०६.२०१०** रोजी, **सकाळी ११.३०** वाजता यशवंत रामा साळवी, ऑलिम्पिक साईज तरण तलाव, कळवा प्रभाग समिती सभागृहात **सभा सुचना क्रमांक -२,दिनांक -२५.०६.२०१०** रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचारविनिमय करणेसाठी आयोजित करण्यात आली होती. सदर सभेचे इतिवृत्तांत पुढीलप्रमाणे :-

सदर सभेस खालीलप्रमाणे सन्मा. सदस्य उपस्थित होते.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. सुभाष आत्माराम खारकर | - | मा. अध्यक्ष |
| २. | श्री. मनोज विठ्ठल लासे | - | मा. उप-महापौर |
| ३. | श्री. अशोक नारायण भोईर | - | सन्मा. सदस्य |
| ४. | श्री. राजेन्द्र रमेश साप्ते | - | सन्मा. सदस्य |
| ५. | श्री. उमेश काशिनाथ पाटील | - | सन्मा. सदस्य |
| ६. | श्रीमती.सुरेखा सुरेश खातू | - | सन्मा. सदस्या |
| ७. | श्री. मिलिंद भारत पाटील | | सन्मा. सदस्य |
| ८. | श्री. दिनेश दाजी कांबळे | - | सन्मा. सदस्य |
| ९. | श्री. राजेश आत्माराम खारकर | - | सन्मा. सदस्य |
| १०. | सौ. अपर्णा मिलिंद साळवी | - | सन्मा. सदस्या |
| ११. | सौ. मनिषा महेश साळवी | - | सन्मा. सदस्या |
| १२. | सौ. प्रमिला मुकूंद केणी | - | सन्मा. सदस्या |
| १३. | ॲड. सौ.अनिता सुनील गौरी | - | सन्मा. सदस्या |
| १४. | श्री. किशोर काशिनाथ भोईर | - | स्विकृत सदस्य |
| १५. | श्री. हेंमंत आत्माराम खारकर | - | स्विकृत सदस्य |

सदर सभेस खालील प्रमाणे सन्मा.सदस्य अनुपस्थित होते.

| | | | |
|---|---|---|---|
| १६. | श्री. गणेश यशवंत साळवी | - | सन्मा. सदस्य |
| १७. | श्री. सचिन जयराज म्हात्रे | - | सन्मा. सदस्य |
| १८. | श्री. प्रभाकर मोतीराम पवार | - | स्विकृत सदस्य |

**वंदे मातरम्‌ने सभेला सुरुवात करण्यात येते.**

*****

**मा. प्रभाग अधिकारी विषयपत्रिका व प्रकरण क्रमांक २ वाचून दाखवितात.**

| प्र. क्र | विषय |
|---|---|
| २) | मा.कळवा प्रभाग समितीचे दिनांक - ३१.०५.२०१० रोजीच्या सभेचे इतिवृत्तांत मंजूर करणे. |

**श्री.उमेश पाटील -सन्मा.सदस्य :-**

मा.अध्यक्ष महोदय, इतिवृत्तातील पान क्र.४ वरील माझ्या वक्तव्यामध्ये कळवा नाका ते आत्माराम चौक या ठिकाणी रस्ते खोदलेले आहेत ११ ते १२ ठिकाणी सिमेंट कॉक्रीटकरण करीत आहेत असे आहे. ११ ते १२ ठिकाणी काम करीत नसून ११ ते १२ कोटीचे काम करीत आहे असे बोललो होतो. तरी सदरची दुरुस्ती करण्यांत यावी.

**प्रकरण क्रमांक २ - दुरुस्तीसह मंजूर**

**मा. प्रभाग अधिकारी प्रकरण क्रमांक ३ वाचून दाखवितात.**

| | |
|---|---|
| ३) | कळवा नाक्यावरील छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा हलविणेबाबत.(सन्मा.सदस्य श्री.उमेश पाटील यांचे पत्र) |

**श्री.मनोज लासे -मा.उप महापौर :-**

मा.अध्यक्ष महोदय, या प्रकरणाचा गोषवारा कुठे आहे ?

**श्री.उमेश पाटील -सन्मा.सदस्य :-**

मा.अध्यक्ष महोदय, छत्रपती शिवाजी महाराजांचा कळवा नाक्यावरील पुतळा पुर्नस्थापित करण्यासंदर्भात मा.आमदार जितेंद्र आव्हाड यांनी एक सभा घेतली होती. त्यानंतर मागच्या सभेतही या विषयावर चर्चा झाली त्यामध्ये हा विषय विषयपत्रिकेवर येणे आवश्यक आहे असे असल्यामुळे हा विषय विषयपत्रिकेवर घेण्यांत आला आहे. आजच्या सभेमध्ये कळवा नाक्यावर होणारी वाहतुकीची कोंडी सुरळित होणेच्या दृष्टीने तेथील पुतळा दोन पुलांच्या मध्ये पुर्नस्थापित करण्याच्या निर्णयास सर्वपक्षिय मान्यता मिळावी. सध्या ज्या ठिकाणी महाराजांचा पुतळा आहे त्या ऐवजी दोन्ही पुलांच्या मध्ये जी जागा आहे तेथे २५ फुटी अश्वारुढ पुतळा स्थापित करावयाचा आहे. हे काम लोकनिधीमधून करावयाचे असून शासनाचा किंवा महापालिकेचा निधी घेतला जाणार नाही. सध्या कळवा नाक्यावर होणारी वाहतूक कोंडी आपण पाहिलेली आहे. हा चांगला निर्णय आहे. तरी आज या सभागृहात ठराव करुन त्यास सर्वपक्षिय पाठिंबा दयावा अशी मी विनंती करतो.

**श्री.मिलींद पाटील -सन्मा.सदस्य :-**

मा.अध्यक्ष महोदय, सध्या तेथे जे सर्कल आहे ते जुन्याप्रमाणे म्हणजे एकच ब्रिज असतानाचे आहे. आता दोन ब्रिज झाल्यामुळे तेथे वाहतुकीची कोंडी व अडथळा निर्माण होतो. त्या दृष्टीने ट्रॅफिक विभागाचे म्हणणे आहे की, मध्य घेऊन (सेंट्रलाईज)त्याप्रमाणे केले तर अडथळा निर्माण होणार नाही. त्यामुळे तेथे असलेला छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा पुर्नस्थापित करावा लागेल. त्यासाठी महापालिकेचा निधी घ्यायचा म्हणजे प्रस्ताव, मंजूरी यामध्ये बराच वेळ जाईल म्हणून लोक निधीतून हे काम आपण करणार आहोत. परंतू सर्वांनी पाठिंबा दिल्याशिवाय हे काम शक्य नाही.

**श्री.मनोज लासे -मा.उप महापौर :-**

मा.अध्यक्ष महोदय, छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा स्थलांतर करण्यासंबंधी हा जो विषय विषयपत्रिकेवर आला आहे त्याबाबत प्रस्ताव बनवून त्याचा व्यवस्थित आराखडा (ड्रॉईंग) काढून सर्व सन्मा.सदस्यांना दाखवावे. त्यामुळे याबाबत योग्य कल्पना येईल. आम्ही हे मा.महापौरांना दाखवतो. वरिष्ठांशी चर्चा करतो, तरी तोपर्यंत काही करु नये असे मला वाटते.

**श्री.राजेंद्र साप्ते -सन्मा.सदस्य :-**

मा.अध्यक्ष महोदय, कळवा नाक्यावरील छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा हलविणेबाबत हा विषयच मुळात चुकीचा आहे. याची प्रशासनाने दखल घ्यावी. येथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळयाची पुर्नस्थापना होण्याबाबतचा विषय आवश्यक आहे. तरी हा विषय गैर आहे. महाराजांचा पुतळा पुर्नस्थापित करण्याच्या प्रस्तावावर ठाण्यातील व कळव्यातील नागरिकांचा विचारविनीमय घ्यावा लागेल. परंतू सध्या पुतळे हलविण्यास परवानगी मिळत नाही. त्यासाठी शासनाची परवानगी घ्यावी लागते. आश्वारुढ पुतळा म्हटला तर वाहतुकीच्या दृष्टीने परवानगी मिळत नाही. कारण त्यावेळी जे शिवप्रेमी,शिवभक्त होते त्यांनी पुतळा बसवण्यासाठी प्रयत्न केले तेव्हाही अश्वारुढ पुतळाच ठरला होता. परंतू अवजड वाहनांच्या वाहतुकीमुळे पुतळयाला हादरे बसू शकतात म्हणून तेथे छोटा पुतळा योग्यच आहे. त्यावेळी परवानगी मिळाली नाही तेव्हा आता मिळेल का ? सन्मा.सदस्यांनी पत्र दिले हे मलाही मान्य आहे परंतू अधिका-यांनी गोषवारा तयार करायला हवा होता. बांधकाम विभागाकडून अभिप्राय घेणे गरजेचे आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचें भव्य स्मारक उभारले जावे हे महाराष्ट्रातील प्रत्येकाचे स्वप्न आहे. महाराज सर्वांचेच आहेत परंतू ही प्रस्तावाची सूचना आलेली आहे तो विषय व्यवस्थित गोषवारा, आराखडा तयार करुन, चर्चा करुन घ्यावा लागेल. तरी तोपर्यंत हे प्रकरण तहकूब ठेवावे.

**श्री.मिलींद पाटील -सन्मा.सदस्य :-**

मा.अध्यक्ष महोदय, मा.उपमहापौर व सन्मा.सदस्य श्री.साप्ते यांनी मांडलेल्या विचारांशी आम्ही सहमत आहोत. आताच्या व तेव्हाच्या भौगोलिक व इतर गोष्टींमध्ये बदल झालेला आहे. आता विषय असा आहे की, पुतळा पुर्नस्थापित करण्यासाठी वेळ लागेल, ते परवानगी आल्यानंतर करु या परंतू पुतळयाच्या पुढील जो भाग व्ही आकारामध्ये आहे तो कमी केला तरी वाहतुकदारांचा त्रास कमी होईल.

**श्री.राजेंद्र साप्ते -सन्मा.सदस्य :-**

मा.अध्यक्ष महोदय, या ठिकाणी वाहतूक कोडींचे मूळ कारण आहे त्याकडे लक्ष दया. बाळकुमकडून येणा-या हेवी ट्रॅफिकबाबत कोण बोलणार ! साकेत मार्गे हया गाडया पोलीसवाले पैसे खाऊन सोडतात. यामुळे येथे अपघात होतात. शाळेतील मुले मागे दोनदा अपघातामध्ये गेलेली आहेत. आमच्या अंगावर त्या केसेस आहेत. त्यावेळी जनतेचा जो उद्रेक झाला, गाडया पेटवल्या, तोडफोड झाली तेव्हा जनतेला आम्ही शांत केले. तोडफोड करणारे कोण होते हे सर्वांना माहित आहे परंतू अशांतता निर्माण झाली म्हणून केसेस आमच्यावर झाल्या. वस्तुस्थिती अशी आहे की, इकडून वाहने गेली तर तीन ठिकाणचा टोल वाचतो. त्यामुळे ट्रॅफिकवाल्यांना पैसे दिले की झाले. कळवा व ठाण्याला जोडणारा आपला हा एकच पूल आहे तोच या हेवी वाहनांमुळे धोकादायक झाला तर आपल्याला पर्याय काय ? पुन्हा जलवाहतुक करायची का ? २० ते ४० टनाच्या गाडया या पूलावरुन जातात. हे महापालिकेच्या दुर्लक्षामुळे होत आहे. पुलाच्या कॅपॅसिटीप्रमाणे वाहने सोडण्यास आमची हरकत नाही परंतू सरस्वती शाळेच्या येथून येणा-या हेवी गाडया पुलावर चढत नाहीत, ड्रायव्हरची दमछाक होते. तेथून शाळेच्या मुलांच्याही रिक्षा, छोटया गाडया जात येत असतात. उद्या काही अपघात झाला तर नालायक आम्ही ठरतो. तरी या मूळ गोष्टीकडे लक्ष दया. या पुलावरुन ज्या हेवी गाडया सोडल्या जातात त्या आधी बंद करा. त्यासाठी तेथे महापालिकेचे सुरक्षारक्षक नेमा. आपले दळणवळणाचे हे एकमेव साधन

आहे व त्याची सुरक्षितता हे आपले आद्यकर्तव्य आहे. तरी मी ठराव मांडतो की महापालिकेचे सुरक्षारक्षक तेथे नेमावेत व अवजड वाहनांची वाहतूक बंद करावी.

**श्री.अशोक भोईर -सन्मा.सदस्य :-**

मा. अध्यक्ष महोदय, सन्मा.सदस्य श्री.साप्ते यांनी मांडलेल्या ठरावास मी अनुमोदन देत आहे.

**श्री.उमेश पाटील -सन्मा.सदस्य :-**

मा.अध्यक्ष महोदय, सन्मा.आमदार यांनी याबाबत विषय घेतला तोही विचार करुनच घेतला असेल. ते महाराष्ट्र शासनाकडे चर्चा करणार असतील, मा.जिल्हाधिकारी यांचेशी बोलणार होते.

**श्री.मिलींद पाटील -सन्मा.सदस्य :-**

मा.अध्यक्ष महोदय, पूर्ण सर्कल सध्या काढण्याची आवश्यकता नाही. प्रथम पुढील भाग काढला तरी चालेल. पुतळयाची परवानगी येईल तेव्हा पाहू.

**श्री.राजेंद्र साप्ते -सन्मा.सदस्य :-**

मा.अध्यक्ष महोदय, कळव्यामधून हेवी वाहतूक बंद झाली आणि अशाही इकडे येणा-या छोटया गाडयाच असतात. मग काय प्रश्न आहे. वाहतुकीची समस्या का वाढली याकडे लक्ष केंद्रीत केले पाहिजे. आम्ही छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळयाचे सुशोभिकरण करण्यासाठी ९७ साली पत्र दिले. सभागृहामध्ये प्रस्ताव दिला आणि केणी मॅडम स्थायी समितीमध्ये असताना बजेट मिळाले. परंतू त्यासाठी आम्ही मेहनत केली होती. आमचे सर्व सदस्य बोललो होतो. त्यानंतर १५ ते २० लाखाचा खर्च करुन सुशोभिकरण केले. ही हेवी वाहतूक बंद करता येईल का ते पहा.

**श्री.मिलींद पाटील -सन्मा.सदस्य :-**

मा.अध्यक्ष महोदय, विषयाला वेगळे वळण लागत आहे तेव्हा...

**श्री.राजेंद्र साप्ते -सन्मा.सदस्य :-**

मा.अध्यक्ष महोदय,शिवस्मारक भव्यदिव्य व्हावे असे सर्वांनाच वाटत आहे. परंतू आधि हे स्मारक बसवताना अनेक मान्यवरांचा हातभार लागला आहे. हिंदुहदयसम्राट श्री.बाळासाहेब ठाकरे यांच्या हस्ते या स्मारकाचे उद्‌घाटन झाले आहे. धर्मवारी आनंद दिघे साहेब असतानाही लांबी रुंदी कमी करण्याबाबत चर्चा झाली होती. तेव्हा आपणही आज इथे चर्चा करण्यापेक्षा आपले लोक प्रतिनिधी व नेते मंडळी यांच्याशी चर्चा करुन प्रस्ताव मांडावा.

**श्री.मिलींद पाटील -सन्मा.सदस्य :-**

मा.अध्यक्ष महोदय, आपण सध्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळयापुढे वाढीव भाग आहे त्याबाबत बोलतोय. त्याबाबतीत आपण इथे निर्णय घेऊ शकतो.

**श्रीमती. सुरेखा सु. खातू, सन्मा.सदस्या :-**

मा. अध्यक्ष महोदय, पुढील भाग काढूनही वाहतूक कोंडी फुटली नाही तर काय करणार ! सर्वपक्षिय नेत्यांना बोलवून चर्चा करु या.

**मा.अध्यक्ष :-**

हा कळव्यातील प्रश्न आहे तेव्हा आपण आपल्या स्तरावर येथे हा प्रश्न सोडवू शकलो असतो असे मला वाटते. ठीक आहे. पुन्हा एकदा या विषयावर सर्व पक्षीय सभा लावू, आमदार व खासदार साहेबांना बोलवू.

**श्री.मनोज लासे -मा.उप महापौर :-**

मा.अध्यक्ष महोदय, जागेवर जाऊन पाहणी करणेही आवश्यक आहे.

**श्री.दिनेश कांबळे -सन्मा.सदस्य :-**

मा. अध्यक्ष महोदय, पुतळयाच्या पुढील भाग काढून घेण्याबाबत इथे निर्णय घ्या.

**श्रीमती. सुरेखा सु. खातू, सन्मा.सदस्या :-**

मा. अध्यक्ष महोदय,अगोदरच विद्रुपीकरण करुन उपयोग नाही. नंतर पाहू.

**मा.अध्यक्ष :-**

याबाबत आपले विभागाचे खासदार व आमदार यांना बोलावून चर्चा करु तोपर्यंत हा विषय तहकूब ठेवू या.

**प्रकरण क्रमांक ३ - तहकूब**

**श्रीमती. सुरेखा सु. खातू, सन्मा.सदस्या :-**

मा.अध्यक्ष महोदय, स्वच्छता निरीक्षक तसेच अधिकारी यांच्याकडून साफसफाईची कामे व्यवस्थित होत नाहीत. जे ठेकेदार आहेत तेही काही कळवित नाहीत. मी स्वच्छता निरीक्षक यांना सांगितले होते. गुणसागरमध्ये नाला साफ न केल्यामुळे पावसाचे पाणी रिव्हर्समध्ये जाऊन लोकांच्या घरात शिरले. ठेकेदार कोण आहे त्याची माहिती घेण्याची मला गरज नाही परंतू त्याच्याकडून काम व्यवस्थित झाले पाहिजे ते होत नाही.

**श्री.राजेंद्र साप्ते -सन्मा.सदस्य :-**

मा.अध्यक्ष महोदय, सन्मा.सदस्या खातू मॅडमनी सांगितल्याप्रमाणे ही वस्तुस्थिती आहे. इथे बसलेला कोणताही सदस्य पावळयापूर्वी झालेल्या नालेसफाई,गटार सफाईबाबत समाधानी नाही. प्रभागातील नगरसेवकाला काम सुरु केल्याबाबत कळविले पाहिजे ते कळविले जात नाही. ज्या ठेकेदाराने काम केले ते कधी केले ते मला माहित नाही. मी याबाबत पटनाईक यांनाही बोललो. आनंदविहार कळवा पूर्वच्या येथे रस्त्यावर सगळी घाण आली आहे. कालही मी जाऊन पाहिले. तेथे आमच्या आया बहिणींना चालताना मुश्कील होत आहे. मी पटनाईकना सांगतो तर ते पुढे ठेकेदाराला सांगतात आणि ठेकेदार मला म्हणतो 'साहेब प्लीज काही ॲक्शन घेऊ नका.' तेथे जे.सी.बी.ने चर मारायचा आहे ते साधे काम होत नाही, हा काय प्रकार आहे ! नालेसफाईबाबत आम्ही समाधानी नाही, गटारे साफ नाहीत. कळवा पूर्वला सर्व नाले तुंबलेले दिसत आहेत. आम्हांला तेथे जायला लाज वाटते.

**श्री. दांडेकर, स्वच्छता निरीक्षक :-**

मा.अध्यक्ष महोदय, आनंदविहारच्या येथे रेल्वेने गटार बुजविले त्यामुळे पाणी रस्त्यावर पसरते.

**श्री.राजेंद्र साप्ते -सन्मा.सदस्य :-**

मा.अध्यक्ष महोदय, तेथे नाल्याचे काम सुरु होते परंतू नवीन ट्रॅकचे काम होणार आहे म्हणून ते काम थाबले आहे. मी इंदिरानगर व शिवशक्तीनगर बाबत बोलत आहे. भिंतीच्या बाजूने चर पाडता येत नाही का ? किती वेळा सांगणार ? तेथे काय परिस्थिती आहे ते जाऊन पहा आणि ते काम त्वरीत करुन घ्या. नितीन पवार तुम्ही लक्ष दया.

**श्री.नितीन पवार - कार्यकारी अभियंता :-**

मा.अध्यक्ष महोदय, लहानसहान गटारे आरोग्य विभागाकडून साफ केली जातात. त्यांनी मागणी केली तर त्यांना जे.सी.बी. दिला जातो. उद्या तेथे चर मारुन घेतील.

**श्री.राजेंद्र साप्ते -सन्मा.सदस्य :-**

मा.अध्यक्ष महोदय,आजच काम झाले पाहिजे आणि प्लॅस्टिकच्या पिशव्यांबाबत काय कारवाई केली जाते ? अजूनही मार्केटला फिरा तेथे प्लॅस्टिकच्या पिशव्या वापरल्या जातात. किती दंड वसूली केली आहे ? राजरोसपणे नाल्यामध्ये प्लॅस्टिक पिशव्या टाकल्या जातात.

**श्री. दांडेकर, स्वच्छता निरीक्षक :-**

मा.अध्यक्ष महोदय, कळवा पूर्व मध्ये १४,०००/- रुपयांची वसुली केली आहे. मार्केटमध्येही फिरतात.

**श्री.राजेंद्र साप्ते -सन्मा.सदस्य :-**

मा.अध्यक्ष महोदय, आनंदविहारच्या येथील काम कधी करणार ते मला सांगा.

**श्री. दांडेकर, स्वच्छता निरीक्षक :-**

मा.अध्यक्ष महोदय, आजच करतो.

**श्री.राजेश खारकर -सन्मा.सदस्य :-**

मा.अध्यक्ष महोदय, विटावा पुलाखाली ज्या दोन केबल आहेत त्या काढून टाका. खड्डे पडलेले आहेत तेथे खडी,माती टाकून प्लेन करुन घ्या. वाहने घसरतात तेव्हा तेथे पट्टया मारुन घ्या म्हणजे लहान वाहने घसरणार नाहीत. सध्या तेथे वाहतुक कोंडी खूप होत आहे. अशीही तेथे वाहतुक कोंडी असतेच. पावसाळयात आणखी वाढते.

**श्री.नितीन पवार - कार्यकारी अभियंता :-**

मा.अध्यक्ष महोदय, तेथे खडी टाकून भरणी करावी लागेल, ती करुन घेतो.

**सौ.मनिषा साळवी -सन्मा.सदस्या:-**

मा. अध्यक्ष महोदय,रेल्वेच्या पलिकडे कचरा टाकलेला असतो तो उचलला जात नाही. वसंत पाटील व दांडेकर यांचे फोन बंद असतात. तेथील जुने शौचालयाची साफसफाई होत नाही. पाऊस पडल्यामुळे पाणी साचते.

**मा.अध्यक्ष :-**

अधिका-यांवर कारवाई केली पाहिजे. फोन बंद का ठेवता ?

**श्री. दांडेकर, स्वच्छता निरीक्षक :-**

मा.अध्यक्ष महोदय, कळवा पूर्व भागात दोन ठिकाणी आज डंपर पाठविले आहेत. तो कचरा प्रदुषण विभागाचा आहे. तेथे कचरा आहे ही वस्तुस्थिती खरी आहे आणि माझा फोन केव्हाव्ही बंद नसतो.

**सौ.प्रमिला केणी -सन्मा.सदस्या:-**

मा. अध्यक्ष महोदय, फोन बंद असतात. मी त्यांना तीनवेळा फोन केला होता.

**श्री. दांडेकर, स्वच्छता निरीक्षक :-**

मा.अध्यक्ष महोदय, मी तरी फोन बंद ठेवत नाही.

**सौ.मनिषा साळवी -सन्मा.सदस्या:-**

मा. अध्यक्ष महोदय,तलावाजवळ अजूनही कचरा साचलेला आहे. तलाव माझ्या प्रभागात नाही परंतू गाळ माझ्या प्रभागात टाकतात. डंपर भरुन कचरा मागच्या बाजूला आणून टाकतात.

**सौ.प्रमिला केणी -सन्मा.सदस्या:-**

मा. अध्यक्ष महोदय, माझ्या प्रभागातीलही कचरा दोन-तीन दिवस उचलला जात नाही.

**श्री.अशोक भोईर -सन्मा.सदस्य :-**

मा. अध्यक्ष महोदय, मुक्री इमारत ही अतिशय धोकादायक झाली आहे. एक दीड वर्ष झाले भोगवटादार असल्याचे पत्र त्यांना आपल्याकडून अजून दिलेले नाही. मे महिन्यात ही इमारत खाली करणे गरजेचे होते. आता पावसाळयात खाली करुन ते लोक रहायला जागा कुठे शोधणार ? आपल्या साकेतच्या येथे तरी त्यांची रहाण्याची सध्या सोय केली तरी इमारत पाडता येईल.

आकाशी साहेब आपण स्वतः पाहणी केली आहे. तेथे बी.एस.यु.पी. योजनेअंतर्गत काम करणार आहेत. आता जर ती इमारत पडली तर नाहक तेथील लोकांना मृत्यूला सामोरे जावे लागेल. त्या लोकांना कशाला त्रास देत आहात ! भोगवटा पत्र आपणं देऊ शकतो. तसेच तेथील रहिवाश्यांच्या रहाण्याची सोय महापालिकेमार्फत करण्यांत यावी. अत्यंत धोकादायक इमारतीबाबत तात्काळ कारवाई करणे आवश्यक होते. कळव्यामध्ये ब-याचश्या अश्या इमारती आहेत त्यावर आपल्या अधिका-यांनी अजूनपर्यंत कारवाई केलेली नाही. मुक्री इमारतीचा एन्ट्रन्स अतिशय धोकादायक झालेला आहे. पावसाळयात त्यांना रुम मिळत नाही. तरी तेथील लोकांची रहाण्याची सोय महापालिकेमार्फत करावी व सदरची इमारत तोडावी अशी विनंती आहे.

**सौ.प्रमिला केणी -सन्मा.सदस्या:-**

मा. अध्यक्ष महोदय, सन्मा.सदस्य अशोक भोईर यांनी जी विनंती केली त्याबद्दल मी त्यांची आभारी आहे कारण माझ्या प्रभागातील विषय त्यांनी मांडला आहे. महापालिकेच्या विस्थापित छावण्यांमध्ये किती काळ रहाता येते. दोन -चार महिन्यांनंतर ते काय करणार ? तरी याबाबत माहिती दयावी.

**श्री.आकाशी - मा. सहा.आयुक्त :-**

मा. अध्यक्ष महोदय, मा.आयुक्तांच्या परवानगीने अश्या छावण्यांमध्ये १० दिवस रहाण्याची परवानगी मिळते.

**सौ.प्रमिला केणी -सन्मा.सदस्या:-**

मा. अध्यक्ष महोदय, त्यांची दुसरीकडे रुम घेण्याची परिस्थिती नसेल तर ते कसे रुम खाली करणार ? १० दिवसानंतर ते लोक कुठे जाणार ?

**श्री.आकाशी - मा. सहा.आयुक्त :-**

मा. अध्यक्ष महोदय, याबाबत ॲड . बी.एच.पाटील यांचे पत्र आले आहे की त्यांना कोणत्याही परिस्थितीत निष्कासीत करण्यांत येऊ नये आणि निष्कासीत केले तर दावा टाकलेला आहे. त्या इमारतीच्या एन्टरन्सलाच बराच धोका आहे. काही भाग केव्हा.ही पडू शकतो ही वस्तुस्थिती आहे.

**सौ.प्रमिला केणी -सन्मा.सदस्या:-**

मा. अध्यक्ष महोदय, तेथील रहिवाश्यांचे म्हणणे आहे की, नंतर आम्हांला तेथे रुम मिळेल का? सध्या त्यांची रहाण्याची व्यवस्था काय ? १० दिवसानंतर ते रहिवाशी कुठे जाणार ?

**श्री.आकाशी - मा. सहा.आयुक्त :-**

मा. अध्यक्ष महोदय, १० दिवस कमी आहेत परंतू मा.आयुक्तांकडेही तेवढेच अधिकार आहेत.

**सौ.प्रमिला केणी -सन्मा.सदस्या:-**

मा. अध्यक्ष महोदय, आता काय करणार ? त्यांना नोटीस दिलेल्या आहेत. आमच्या कार्यालयात ते रहिवाशी येऊन बसतात.

दुसरे म्हणजे परिवहनच्या गाडया उभ्या असतात तेथे कचरा साचलेला असतो. परिवहनलाही याबाबत पत्र दिलेले आहे तेही ऐकत नाहीत. गाडयांमुळे तेथे ट्रफिक होते. तेथे शाळा आहे. मुलांची येजा चालू असते. एखादा अपघात झाला तर काय करणार !

**मा.अध्यक्ष :-**

तेथे शाळा आहे, विद्यार्थ्यांना त्रास होतो. वाहुकीलाही अडथळा निर्माण होतो. तरी गाडया त्वरीत उचलल्या जाव्यात.

**सौ.प्रमिला केणी -सन्मा.सदस्या:-**

मा. अध्यक्ष महोदय, साफसफाई प्रभागामध्ये व्यवस्थित न झाल्यामुळे मारुतीनगरमध्ये कमरेभर पाणी साचले होते. मी तेथे उभी राहून काम करुन घेतले. वसंत पाटील कामगार काम करीत असताना अर्जंट फोन आला आहे तेव्हा तिकडे कामगार लागतील असे सांगून अर्धवट काम सोडून कामगार घेऊन जातात. प्रत्येकवेळी आम्ही किती ठिकाणी खाजगी कामगार लावून कामे करुन घ्यायची ?

**श्री. दांडेकर, स्वच्छता निरीक्षक :-**

मा.अध्यक्ष महोदय, मी निपूर्ते साहेबांशी बोलून घेतो. त्यांचेकडे घनकचरा विभाग आहे. त्यांना बोंलावून परिस्थिती दाखवतो.

**श्री.मिलींद पाटील -सन्मा.सदस्य :-**

मा.अध्यक्ष महोदय, आम्हांला नगरसेवक निधी पाच पंधरा हजार वाढवून दया आम्हीच आमच्या प्रभागात कामे करुन घेतो. मग आम्हांला तुमची गरज नाही.

**सौ.अनिता गौरी -सन्मा.सदस्या:-**

मा. अध्यक्ष महोदय, हे बरोबर आहे. अशीही आम्ही आत्ता आमची कामे खाजगी कामगार लावून करुन घेत आहोत.

**मा.अध्यक्ष :-**

प्रभाग विकास निधी व नगरसेवक निधीप्रमाणें जो निधी महापालिका पावसाळयातील कामे करण्यासाठी वापरते तो निधी प्रत्येक प्रभागासाठी वाटून आम्हांला दया. आम्ही आमची कामे करुन घेऊ. याबाबत ठराव करा.

**श्री.मिलींद पाटील -सन्मा.सदस्य :-**

मा.अध्यक्ष महोदय, मी याबाबत ठराव मांडतो की, प्रत्येक प्रभागामध्ये पावसाळयापूर्वी जी नालेसफाई, गटार सफाई व इतर साफसफाईची कामे केली जातात त्यासाठी महापालिकेचे कामगार कमी पडतात त्यामुळे कामे वेळेवर होत नाहीत. पर्यायी पावसाळयामध्ये पाणी तुंबणे,लोकांच्या घरात पाणी शिरणे, जागोजागी कचरा साचलेला असतो त्यामुळे रोगराई पसरणे या गोष्टींना सामोरे जावे लागते. तरी या कामाचा निधी प्रत्येक प्रभागामध्ये नगरसेवकाला वाटून दयावा जेणेकरुन नगरसेवक आपापल्या प्रभागातील कामे स्वतः करुन घेतील.

**सौ.अनिता गौरी -सन्मा.सदस्याः-**

मा. अध्यक्ष महोदय, सन्मा.सदस्य मिलींद पाटील यांनी मांडलेल्या ठरावास मी अनुमोदन देत आहे.

तसेच रस्त्यावरील खड्डयांचे काय ? जागोजागी खड्डे पडलेले आहेत ते कधी भरणार ?

**श्री.नितीन पवार - कार्यकारी अभियंता :-**

मा.अध्यक्ष महोदय,सन्मा.सदस्या गौरी मॅडम यांच्या प्रभागातील चाहू दादा पाटील मार्ग ते वॉटरसप्लाय पर्यंत काम केले आहे.

**सौ.अनिता गौरी -सन्मा.सदस्याः-**

मा. अध्यक्ष महोदय,रवींद्र हॉटेल ते उतरणीचा रस्ता, हायवेचा रस्त्याबाबत मी बोलतेय. मी दरवर्षी वारंवार या रस्त्याबाबत बोलत असते परंतू काही काम करीत नाहीत. रुस्तुमजीच्या येथील रस्ता हायवेला लागून बनविला जात आहे तो कसा होतो ? मग आमच्या गावासाठी रस्ता का होत नाही ? तेथे अपघात होतात कारण चढण, उतरण जास्त आहे. लोढाच्या रस्त्याचे संपूर्ण काम झाले आहे ते काम कसे झाले आहे ? याबाबत माझा आक्षेप आहे तरी मला याची माहिती दया. वरुन मंजुरी आली का ? गावातील लोकांसाठी डंपर व रोलर मिळत नाही. मला पुढील सभेमध्ये याबाबतचा अहवाल हवा आहे.

**श्री.नितीन पवार - कार्यकारी अभियंता :-**

मा.अध्यक्ष महोदय,रवींद्र हॉटेल ते हायवे पर्यतच्या रस्त्यासाठी कॉक्रीटीकरणाचा प्रस्ताव तयार केला होता. त्यानंतर तेथे अल्ट्रा थीन व्हाईट टॉपीकचे काम सुरु झाले. मॅडम महापौरांकडे गेल्या होत्या त्यावेळी मी गायकवाड साहेबांशी चर्चा झाली होती. त्यांच्याकडून प्रस्ताव केला जाणार आहे.

.

**श्री.उमेश पाटील -सन्मा.सदस्य :-**

मा.अध्यक्ष महोदय, सन्मा सदस्या बोलतायतं, तिथे खरोखरच अपघात होतात. खाली उतरताना, चढताना गाडया घसरतात. आम्ही वारंवार सभेमध्ये बोंलतो. पुढील दीडवर्षामध्ये हे काम होईल का ?

**श्री.नितीन पवार - कार्यकारी अभियंता :-**

मा.अध्यक्ष महोदय, याबाबत मा.महापौरांकडे चर्चा झाली तेंव्हा मा.महापौरांनी त्यांना ओदश दिले आहेत. मी याबाबत गायकवाड साहेबांशी बोलून घेतो.

**सौ.अनिता गौरी -सन्मा.सदस्याः-**

मा.अध्यक्ष महोदय, मी निवडून आल्यापासून बहुतेक सर्व सभांमध्ये या रस्त्याबाबत बोलले आहे परंतू दरवेळी या कामासाठी टाळाटाळ करीत आहेत. गाववाल्यांसाठी सुविधा होत नाहीत. मात्र नविन कॉप्लेक्सना रस्ता,पाणी सर्व सोयी मिळतात.

**श्री.राजेंद्र साप्ते -सन्मा.सदस्य :-**

मा.अध्यक्ष महोदय, सन्मा.सदस्या अनिता गौरी पोटतिडकीने बोलत आहेत याची प्रशासन दखल घेणार आहे की नाही ! प्रत्येक सदस्याच्या बाबतीत हीच परिस्थिती आहे. हायवेला जोडणारा हा गावातून गेलेला रस्ता आहे. वर जाताना व खाली उतरताना तेथे अपघात होतात. त्यामुळे ते काम होणे गरजेचे आहे. तुमच्याकडून होणारे काम नसेल तर तसे स्पष्ट सांगा.

**मा.अध्यक्ष :-**

काही कामांना महत्व देऊन पहिल्यांदा पूर्ण करा. याबाबत गायकवाड साहेबांशी बोलून घ्या.

**श्री.अशोक भोईर -सन्मा.सदस्य :-**

मा.अध्यक्ष महोदय, काही काम होणार नाही. सन्मा.सदस्या २/३ वर्षापासून रस्त्याबाबत बोलत आहेत. नितीन पवार टाळाटाळ करीत आहेत असे माझे स्पष्ट मत आहे. अधिका-यांना कितीही बोला चालढकल चाललेली असते. सिव्हरेजच्या कामाचेही असेच आहे. एकाला विचारले की दुस-याकडे बोट दाखवतात. आपली जबाबदारी झटकून दुस-यावर टाकणे हेच चालले आहे. गायकवाड यांनी आज सभेमध्ये हजर रहायला हवे होते. कळवा -खारेगांव-विटावा या विभागांचा विकास करायचा आहे तेव्हा कामे करा. कामे करायची नसतील तर चालते व्हा असे माझे स्पष्ट मत आहे. कामचूकार अधिका-यांची आम्हांला गरज नाही. मागच्या दोन वर्षात तुम्ही गायकवाडना विचारले का ?

**श्री.नितीन पवार - कार्यकारी अभियंता :-**

मा.अध्यक्ष महोदय, अल्ट्रा थीन व्हाईट टॉपीकचे काम गायकवाड साहेबांकडे दिले आहे ते मी करु शकत नाही.

**श्री.राजेंद्र साप्ते -सन्मा.सदस्य :-**

सदस्यंनी केलेली मागणी पुर्ण करणे तुमच्या अधिकारात येत नसेल तर ते तुमच्या खादयांवर का घेता ? मा.अध्यक्ष महोदय, योग्य उत्तर देणारे अधिकारी उपस्थित नाहीत. प्रत्येकवेळी आम्ही सभेमध्ये बोलतो त्यावर काहीही होत नाही. पुन्हापुन्हा तेच विषय सभेमध्ये बोलावे लागतात. तेव्हा अधिकारी वर्ग सभेस उपस्थित रहात नाहीत व उत्तरे व्यवस्थित मिळत नाहीत या निषेधार्थ सभा तहकूब करा. आठ दिवसांनी सभा पुन्हा लावा.

**मा.अध्यक्ष :-**

ड्रेनेजचे काम झाल्याशिवाय अल्ट्रा थीन व्हाईट टॉपीकचे काम होणार नाही.

**सौ.अनिता गौरी -सन्मा.सदस्या:-**

मा.अध्यक्ष महोदय,ड्रेनेज लाईनचे काम अजून दोन वर्ष चालेल मग तोपर्यंत रस्ता होणार नाही ! पावसाळा सुरु झाला तरी माझ्या प्रभागातील झाडांच्या फांदया छाटलेल्या नाहीत. मी झाडे लावण्यासाठी माती हवी असल्याबाबत पत्र दिले होते परंतू अद्याप माती आलेली नाही.

**श्री.धावडे - वृक्ष अधिकारी :-**

मा.अध्यक्ष महोदय, फांदया छाटण्याचे काम आत्ता सुरु केले आहे.मी आपल्याला झाडांसाठी माती देतो.

**सौ.मनिषा साळवी -सन्मा.सदस्या :-**

मा.अध्यक्ष महोदय, स्टेशन रोड ते मुकंद कंपनी रस्त्याचे काय झाले ? कधी होणार ?

**श्री.नितीन पवार - कार्यकारी अभियंता :-**

मा.अध्यक्ष महोदय, निविदा दिलेली आहे परंतू ड्रेनेजच्या कामामुळे रस्त्याचे काम होत नाही.

**सौ.मनिषा साळवी -सन्मा.सदस्या :-**

मा.अध्यक्ष महोदय, माझ्या प्रभागामध्ये जुने विद्युत खांब धोकादायक आहेत ते कधी काढणार ? काही ठिकाणी खांबावरील लाईट बंद आहेत तेही सुरु करा.

**श्री.उमेश पाटील -सन्मा.सदस्य :-**

मा.अध्यक्ष महोदय, जुने खांब कधी काढणार ?

**श्री.गुप्ते - उप अभियंता(विद्युत) :-**

मा.अध्यक्ष महोदय, संपूर्ण कळवा समिती कार्यक्षेत्रातील २१ खांब काढले आहेत. सन्मा. सदस्यांच्या प्रभागातीलही काढून घेतो.

**श्री.राजेश खारकर -सन्मा.सदस्य :-**

मा.अध्यक्ष महोदय, निर्मल अभियान अंतर्गत शौचालयाचे काम हाती घेतले होते ते अर्धवट सोडले आहे. याबाबत नागरिकांचा विचार करावयाचा आहे की नाही. ही कामे पूर्ण कधी होणार ? श्री.अहिरे यांना सभेमध्ये बोलावून घ्या. त्यांना फोन केला तर ते फोनही उचलत नाहीत. पुढील सभेमध्ये अधिकारी नसतील तर पुढील विषय न घेता तिथेच थांबू.

**श्री.आकाशी - मा. सहा.आयुक्त :-**

मा.अध्यक्ष महोदय, अहिरें यांना फोन केला होता. ते हायकोर्टात गेले आहेत. मी त्यांना कोणत्या हायकोर्टाचे समन्स होते ते मला उद्या दाखवा असे सांगितले आहे.

**मा.अध्यक्ष :-**

आजच्या सभेमध्ये जे विषय सन्मा.सदस्यांनी घेतले त्याबाबत संबंधित अधिका-यांनी काय कार्यवाही केली याबाबत पुढील सभेमध्ये सन्मा.सदस्यांना माहिती दयावी.

**श्री.उमेश पाटील -सन्मा.सदस्य :-**

मा.अध्यक्ष महोदय, मागच्या महिन्यात सभा झाली त्यावेळी आपले विषय/प्रश्न सन्मा.सदस्यांनी मांडले त्यावर अधिका-यांनी काय पूर्तता केली ते विचारा.

**सौ.मनिषा साळवी -सन्मा.सदस्या :-**

मा.अध्यक्ष महोदय, माझ्या प्रभागात ठिकठिकाणी कचरा साचलेला आहे, साफसफाई होत नाही. तेव्हा ठिकठिकाणी फवारणी होंणे व पावडर टाकणे आवश्यक आहे. साथीचे रोग पसरत आहेत.

**मा.अध्यक्ष :-**

नेरुरकर साहेब विभागांमध्ये फवारणी सगळीकडे वेळोवेळी होईल याची दक्षता घ्या.

**श्री.राजेंद्र साप्ते -सन्मा.सदस्य :-**

मा.अध्यक्ष महोदय, आतापर्यत झालेल्या चर्चेनुसार सर्व सन्मा सदस्यांच्या भावना लक्षात घेता एक गोष्ट आपल्या लक्षात आली असेल की, कोंडवाडा, ड्रेनेज, पाण्याचा प्रश्न, कचरा, साफसफाई, रस्ते

याबाबत सर्व प्रभागांमध्ये जवळपास सारखीच परिस्थिती आहे. माझ्या प्रभागात भयानक परिस्थिती आहे. लोकांच्या समस्या आम्ही येथे मांडतो. तेथील सुपरवायझर काय करतात ? त्यांना ही परिस्थिती दिसत नाही का ? सन्मा.सदस्यांनी प्रत्येक सभेमध्ये आपल्या भावना व्यक्त करायच्या, इतिवृत्तांत होणार, चर्चा होणार परंतू त्याचा उपयोग काय ? प्रभागांमध्ये लाईटचे पोल बंद आहेत त्याबाबत रोजच्या रोज रिपोर्ट तुमच्याकडे येतात का ? मुंबईमध्ये आज काय प्रकार घडतातयतं हे सर्वांना माहित आहेत. उद्या ठाण्यामध्येही तसे प्रकार घडायला लागले तर याला जबाबदार कोण ? विद्युत विभागाचे काम काय ? कळवा प्रभाग समिती दुर्लक्षित आहे. वरिष्ठ अधिकारी दुर्लक्ष करतात असा आमचा आरोप आहे. कोणतेही काम असो त्याबाबत कोणीही सदस्य समाधानी नाही. अधिकारी सभेमध्ये उपस्थित नसतात. आमच्या प्रश्नांबाबत पुढे काय झाले हे कळत नाही मग आम्ही सभेमध्ये कशासाठी यायचे ? तेव्हा आजची सभा तहकूब करा व आठ दिवसांनी पुन्हा सभा लावा. पुढील सभेत अधिकारी उपस्थित रहायला हवेत.

**<u>श्री.उमेश पाटील -सन्मा.सदस्य :-</u>**

मा.अध्यक्ष महोदय, सन्मा.सदस्य श्री.साप्ते यांनी सभेमध्ये सन्मा.सदस्यांच्या प्रश्नांची योग्य दखल घेतली जात नाही यासाठी सभा तहकूबी मांडली आहें तरी त्यास मी अनुमोदन देत आहे.

**<u>मा.अध्यक्ष :-</u>**

सन्मा.सदस्य आज सभेमध्ये प्रश्न मांडतात तेच पुन्हा पुढील सभेमध्ये मांडतात. तेच तेच वारंवार बोलावे लागते. आता सन्मा.सदस्य साप्ते यांनी मांडलेल्या प्रश्नांबाबत पुर्तता झाली पाहिजे. प्रत्येक सन्मा.सदस्य जे सांगतात त्याबाबत अंमलबजावणी अधिका-यांनी केली पाहिजे.

**<u>श्री.आकाशी - मा. सहा.आयुक्त :-</u>**

मा.अध्यक्ष महोदय, माजिवडा प्रभाग समितीमध्ये मी असताना प्रभाग समितीची जी बैठक होते त्यामधील प्रश्नांची पूर्तता करुन सन्मा.सदस्यांना काय कार्यवाही केली हे १५ दिवसांत सांगावे लागते. तरी अशी पध्दत येथे राबवावी लागेल असे दिसते.

**<u>श्री.दिनेश कांबळे -सन्मा.सदस्य :-</u>**

आकाशी साहेब अशी पध्दत येथेही राबवा.

**<u>मा.अध्यक्ष :-</u>**

ज्या ठिकाणाहून कचरा उचलला तेथे पावडर मारणे आवश्यक असते, हेही आम्ही सांगायचे का ? तेव्हा सन्मा.सदस्यांच्या प्रश्नांबाबत उपाययोजना होत नाही कारणासाठी आजची सभा तहकूब करण्यांत येत आहे.

**<u>श्री.आकाशी - मा. सहा.आयुक्त :-</u>**

मा.अध्यक्ष महोदय, सन्मा.सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नांना १५ दिवसांत उत्तर देण्यांत यावे अश्या सूचना मी अधिका-यांना देतो. दिलेल्या उत्तराने समाधान झाले तर प्रश्न नाही परंतू समाधान झाले नसेल तर योग्यप्रकारे समाधान होईल असे पहावे. जर मुख्यालयामध्ये किंवा इतर विभागातील काम असल्यास तसे कळवावे. तश्या आजच मी सर्वांना पत्राद्वारे सूचना देतो.

**<u>श्री.नितीन पवार - कार्यकारी अभियंता :-</u>**

मा.अध्यक्ष महोदय, सर्व सन्मा.सदस्यांना सांगू इच्छितो की, प्रभागासाठी मिळणा-या निधीमध्ये यावर्षी वाढ झालेली आहे. प्रभाग विकास निधी २७,४७,०००/- व नगरसेवक निधी १४,५५,०००/- मिळणार आहे. प्रत्येकी एकूण ४२ लाख रक्कम मिळेल.

**मा.अध्यक्ष :-**

आजची सभा इथेच तहकूब करण्यांत येत असून पुढील ८-१० दिवसांत पुन्हा सभा लावण्यांत यावी व सदर सभेत सन्मा.सदस्यांना समाधानकारक उत्तरे मिळाली पाहिजेत.

:-:-:-:-:-:-:-:-:-:-:

**प्रकरण क्रमांक २ - विषय :** मा.कळवा प्रभाग समितीचे दिनांक - ३१.०५.२०१० रोजीच्या सभेचे इतिवृत्तांत मंजूर करणे.

**मा. कळवा प्रभाग समिती ठराव क्रमांक - २,दिनांक -३०.०६.२०१०**

**ठराव**

प्रकरण क्रमांक २ पाहतां, मा.कळवा प्रभाग समितीचे दिनांक ३१.०५.२०१० रोजीच्या सभेंचे इतिवृत्तांत दुरुस्तीसह ही समिती वाचून कायम करीत आहे.

**सुचक -** श्री. उमेश पाटील **अनुमोदक -** श्री.अशोक भोंईर

**सर्वानुमते मंजूर**

सही/- सुभाष खारकर,
**अध्यक्ष,**
**कळवा प्रभाग समिती,**
**ठाणे महानगरपालिका, ठाणे.**

**प्रकरण क्रमांक ३ - विषय :** कळवा नाक्यावरील छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा हलविणेबाबत.(सन्मा.सदस्य श्री.उमेश पाटील यांचे पत्र)

**मा. कळवा प्रभाग समिती ठराव क्रमांक - ३ ,दिनांक -३०.०६.२०१०**

**ठराव**

मा.कळवा प्रभाग समितीच्या सभेमध्ये कळवा नाक्यावरील छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा स्थलांतरीत करणेच्या विषयावर उपस्थित सर्व सन्मा.सदस्यांनी चर्चा केली असता, छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा स्थलांतर करण्यासंबंधी हा जो विषय विषयपत्रिकेवर आला आहे त्याबाबत सदर विषयाचा गोषवारा,प्रस्ताव बनवून,त्याचा व्यवस्थित आराखडा (ड्रॉईंग) काढून सर्व सन्मा.सदस्यांना दाखवावे. तसेच संबंधित विषयाबाबत सर्व पक्षिय नेते मंडळी व पदाधिकारी यांना बोलावून चर्चा करुन निर्णय घ्यावा लागेल. तरी तोपर्यंत हे प्रकरण तहकूब ठेवण्यांत यावे असे ही समिती ठरवित आहे.

**सुचक -** श्री. राजेंद्र साप्ते **अनुमोदक -** श्री.मिलींद पाटील

**सर्वानुमते मंजूर**

सही/- सुभाष खारकर,
**अध्यक्ष,**
**कळवा प्रभाग समिती,**
**ठाणे महानगरपालिका, ठाणे.**

**मा. अध्यक्ष महोदय यांच्या परवानगीने चर्चेच्या अनुषंगाने घेण्यात आलेला विषय.**

**मा. कळवा प्रभाग समिती ठराव क्रमांक - ४ ,दिनांक -३०.०६.२०१०**

**ठराव**

मा.कळवा प्रभाग समितीच्या दि.३०.६.२०१० च्या सभेमध्ये कळवा नाक्यावरील छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा स्थलांतरीत करणेच्या विषयावर चर्चा करण्यांत आली. सदर विषयावर चर्चा करतेवेळी सन्मा.सदस्य राजेंद्र साप्ते यांनी वाहतूकीची कोंडी कमी करण्यासाठी वाहतूकीची कोंडी का होते याच्या मूळ कारणाकडे लक्ष वेधून त्यावर उपाययोजना करण्याबाबत चर्चा केली.
बाळकुमकडून साकेत मार्गे येणा-या अवजड वाहनांना (हेवी) पोलीसवाले पैसे खाऊन सोडतात. या मार्गाने वाहने गेली तर तीन ठिकाणचा टोल वाचतो. त्यासाठी ट्रॅफिकवाल्यांना पैसे दिले जातात. कळवा व ठाण्याला जोडणारा आपला हा एकच पूल आहे तोच या अवजड वाहनांमुळे धोकादायक झाला तर आपल्याला पुन्हा जलवाहतुक करावी लागेल. २० ते ४० टनाच्या गाडया या पूलावरुन जातात. हे महापालिकेच्या दुर्लक्षामुळे होत आहे. सरस्वती शाळेच्या येथून येणारी अवजड वाहने पुलावर चढत नाहीत, ड्रायव्हरची दमछाक होते. तेथून शाळेच्या मुलांच्याही रिक्षा, छोटया गाडया जात येत असतात. उद्या काही अपघात झाला तर याला जबाबदार कोण ?यामुळे शाळेतील मुलांचा मागे दोनदा अपघात झाला असून त्यामध्ये ४ मुलांचे प्राण गेलेले आहेत. तरी या मूळ गोष्टीकडे लक्ष देऊन या पुलावरुन जी अवजड वाहने सोडली जातात त्यांची वाहतूक बंद करण्यासाठी व आपले दळणवळणाचे हे एकमेव साधन आहे त्याची सुरक्षितता हे आपले आद्यकर्तव्य आहे त्यासाठी तेथे महापालिकेचे सुरक्षारक्षक नेमले जावेत.

सबब, कळवा पूलावरती महापालिकेचे सुरक्षारक्षक तातडीने नेमावेत व अवजड वाहनांची वाहतूक बंद करावी असा ठराव ही समिती मांडत आहे.

**सुचक -** श्री. राजेंद्र साप्ते **अनुमोदक -** श्री.अशोक भोईर

**सर्वानुमते मंजूर**

सही/- सुभाष खारकर,
**अध्यक्ष,**
**कळवा प्रभाग समिती,**
**ठाणे महानगरपालिका, ठाणे.**

:-:-:-:-:-:-:-:-:-:

**मा. अध्यक्ष महोदय यांच्या परवानगीने चर्चेच्या अनुषंगाने घेण्यात आलेला विषय.**

**मा. कळवा प्रभाग समिती ठराव क्रमांक - ४ ,दिनांक -३०.०६.२०१०**

**ठराव**

मा.कळवा प्रभाग समितीच्या दि.३०.६.२०१० च्या सभेमध्ये पावसाळया आधि होणारी प्रभागातील साफसफाई समाधानकारक न झाल्याबाबत नाराजी व्यक्त केली गेली. कामगार वर्ग कमी असल्याचे संबंधित अधिकारी वर्गाची तक्रार असते. वारंवार याबाबत चर्चा करुनही कर्मचारी वर्ग कमी होत आहे. प्रसंगी खाजगी कामगार लावून सन्मा.सदस्यांना वेळावेळी कामे करुन घ्यावी लागतात.

प्रत्येक प्रभागामध्ये पावसाळयापूर्वी जी नालेसफाई, गटार सफाई व इतर साफसफाईची कामे केली जातात त्यासाठी महापालिकेचे कामगार कमी पडतात त्यामुळे कामे वेळेवर होत नाहीत. पर्यायी

पावसाळयामध्ये पाणी तुंबणे,लोकांच्या घरात पाणी शिरणे, जागोजागी कचरा साचलेला असतो त्यामुळे रोगराई पसरणे या गोष्टींना सामोरे जावे लागते. तरी सर्व सन्मा. सदस्यांनी अशी मागणी केली की,' या कामाचा निधी प्रत्येक प्रभागामध्ये नगरसेवकाला वाटून दयावा जेणेकरुन नगरसेवक आपापल्या प्रभागातील कामे स्वतः करुन घेतील.'

सबब, प्रभाग विकास निधी व नगरसेवक निधीप्रमाणें पावसाळयापूर्वी करावयाच्या कामांचा निधी सन्मा.सदस्यांना वाटून देण्यांत यावा, जेणेकरुन सन्मा.सदस्य आपापाली कामे स्वतः करुन घेतील असे ही समिती ठरवित आहे.

**सुचक -** श्री. मिलींद पाटील **अनुमोदक -** सौ.अनिता गौरी

**सर्वानुमते मंजूर**

सही/- सुभाष खारकर,
**अध्यक्ष, कळवा प्रभाग समिती,**
**ठाणे महानगरपालिका, ठाणे.**

:-:-:-:-:-:-:-:-:

**मा. अध्यक्ष महोदय यांच्या परवानगीने चर्चेच्या अनुषंगाने घेण्यात आलेला विषय.**

**मा. कळवा प्रभाग समिती ठराव क्रमांक - ५ ,दिनांक -३०.०६.२०१०**

**ठराव**

मा.कळवा प्रभाग समितीच्या दि.३०.६.२०१० च्या सभेमध्ये सन्मा.सदस्यांनी प्रभागामध्ये कामे समाधानकारक होत नसल्याची तक्रार केली. सन्मा.सदस्यांनी प्रत्येक सभेमध्ये त्याच त्याच आपल्या भावना व्यक्त करायच्या, इतिवृत्तांत होणार, चर्चा होणार परंतू त्याचा काही उपयोग होत नाही. कळवा प्रभाग समिती दुर्लक्षित असून वरिष्ठ अधिकारी दुर्लक्ष करतात असे सन्मा.सदस्यांचे म्हणणे आहे. अधिकारी सभेमध्ये उपस्थित नसतात. सदस्यांनी मांडलेल्या प्रश्नांबाबत पुढे काय झाले हे कळत नाही मग सभेमध्ये कशासाठी यायचे ? तेव्हा आजची सभा तहकूब करावी असे सन्मा.सदस्यांनी सूचना केली.

सबब, मा.कळवा प्रभाग समितीच्या सभेमध्ये मांडलेल्या नागरिकांच्या प्रश्नांबाबत सन्मा.सदस्य असमाधानी असून, प्रभागातील कामे होत नाहीत व सभेमध्ये समाधानकारक उत्तरे दयायला अधिकारी उपस्थित नसतात या कारणास्तव ही सभा तहकूब करण्यांत येत आहे असे ही समिती ठरवित आहे.

**सुचक -** श्री. राजेंद्र साप्ते **अनुमोदक -** श्री.उमेश पाटील

**सर्वानुमते मंजूर**

सही/- सुभाष खारकर,
**अध्यक्ष, कळवा प्रभाग समिती,**
**ठाणे महानगरपालिका, ठाणे.**

:-:-:-:-:-:-:-:-:

(त्यानंतर मा.अध्यक्ष यांनी सभा तहकूब केल्याचे जाहिर केले.)

**सभा संपल्याची वेळ** :- दुपारी १.४०वाजता.
**दिनांक** :- ३०.०६.२०१०
**कळवा प्रभाग समिती,**
**ठाणे महानगरपालिका, ठाणे.**

सही/- सुभाष खारकर,
**अध्यक्ष, कळवा प्रभाग समिती,**
**ठाणे महानगरपालिका, ठाणे.**

सही/- प्रभावती भालेराव,
**प्रभाग अधिकारी**
**कळवा प्रभाग समिती,**
**ठाणे महानगरपालिका, ठाणे.**